ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

Impact Factor – 6.625 ▪ Special Issue - 000 ▪ December 2020 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Recommended Journal

Multidisciplinary International E-Research Journal

– संपादक मंडळ –

डॉ. अजय गव्हाणे   प्रा.डॉ. सुरेश भालेराव   प्रा. ज्ञानोबा ढगे

प्रा.डॉ.अविनाश पांचाळ   प्रा.डॉ.पंडित लांडगे   प्रा.संतोष कोल्हे   प्रा.डॉ.भालचंद्र धर्मापुरीकर

Printed by

PRASHANT PUBLICATIONS

3, Pratap Nagar, Sant Dnyaneshwar Mandir Road, Near Nutan Maratha Mahavidyalaya, Jalgaon.
Website: www.prashantpublications.com   Email: prashantpublication.jal@gmail.com
Ph: 0257-2235520, 2232800, 9665626717, 9420036460

**EDITORIAL POLICIES -** Views expressed in the papers / articles and other matter published in this issue are those of the respective authors. The editor and associate editors does not accept any responsibility and do not necessarily agree with the views expressed in the articles. All copyrights are respected. Every effort is made to acknowledge source material relied upon or referred to, but the Editorial Board and Publishers does not accept any responsibility for any inadvertent omissions.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded


18. महाराष्ट्राची राजकीय पार्श्वभुमी महाराष्ट्राची राजकीय पार्श्वभुमी ..... 50
श्री. रमेश जगन्नाथ निकम, डॉ. डी. आर. भागवत

19. महात्मा गांधीजींचे स्वदेशी व खादी विषयीक विचार ..... 52
प्रा. शिंदे नारायण अंबू

20. यशवंत मनोहरांच्या 'प्रतीक्षायन' तील भावविश्व ..... 55
प्रा. नामदेव महादू गावित

21. महिला सुरक्षा विषयक कायदे ..... 57
प्रा. भरत. व्ही. जाधव

22. गांधी तत्त्वज्ञान आणि आधुनिक जग ..... 60
प्रा. शिवाजी बाबूराव मोहाळे

23. कोविड–19 नंतरचे जग...... ! ..... 62
डॉ. माधव चोले

24. कोरोना महामारीच्या काळात नव्याने बनवण्यात आलेले व्हेंटिलेटर्स व अन्य वैद्यकीय उपकरणे यांचा सविस्तर आढावा ..... 66
सौरभ संजय पाटील

25. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार ..... 68
प्रा. के. एस. तिडके

26. समकालीन मराठी कविता ..... 70
प्रा. डॉ. शोभा डहाळे

27. महात्मा गांधी यांच्या राजकीय विचारांची प्रासंगिकता ..... 72
प्रा. विनायक जाधव

28. आदिवासी समुदायाच्या विकासाकरिता संविधानिक तरतुदी : सिध्दांत आणि वास्तव ..... 74
प्रा. डॉ. लांडगे पी. एस.

29. अनुसूचित जमाती राजकीय आरक्षणाची फलश्रुती ..... 78
प्रा. डॉ. लांडगे पी. एस.

30. 'महाराष्ट्र राज्य स्थापनेचे 60 वर्षे' ..... 83
प्रा. वर्षा वैजनाथ चंदनशिवे

31. महाराष्ट्राची राजकीय वाटचाल ..... 86
प्रा. डॉ. आंधळे वी. व्ही.

32. छत्रपती राजर्षी शाहु महाराजांचे शिक्षण विषयक कार्य ..... 88
प्रा. डॉ. कऱ्हाळे विलास लिंबाजी

33. डॉ. शंकरराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या राजकारणातील योगदान ..... 90
डॉ. संजय सागर सपकाळ

34. म.गांधीचे धर्म आणि राजकारण संबंधी विचार : एक राजकीय अभ्यास ..... 95
प्रा. डॉ. इकबाल खान गफार खान

35. मानव अधिकार : उदय व विकास ..... 97
प्रा. पी. डी. गोणारकर

36. सत्यशोधक कर्मवीर गणपत दादा मोरे यांचे नाशिक जिल्ह्यातील कार्य (1874–1953) ..... 102
ज्ञानोबा त्रिंबक ढगे

37. संत महिम्यातील अध्यात्मिक साहित्याचा मळा फुलवणाऱ्या संत : जनाबाई ..... 106
डॉ. संजीवनी चंद्रशेखर बाराहाते

ISSN : 2348-7143
December 2020
RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor (SJIF) - 6.625 | Special Issue 0000 : डॉ. सुनिल शिंदे सेवापूर्ती निमित्त संशोधन लेखसंग्रह

# कोविड–१९ नंतरचे जग... !

डॉ. माधव चोले
सहयोगी प्राध्यापक (राज्यशास्त्र विभाग)
देगलूर महाविद्यालय, देगलूर

चीन मधिल वुहान शहरात कोरोना–१९ सुरु होवुन या संसर्ग विषानुचा प्रसार सर्व जगभर झाला आणि सर्व जग या संसर्ग विषाणूच्या कचाट्यात सापडले. या संसर्ग रोगाला आटोक्यात आणण्याचा एक प्रयत्न म्हणून संपुर्णता शहरे आणि देश लॉकडाऊन आणि समाजातील व्यक्ती–व्यक्तीमध्ये अंतर ठेवण्याचा पर्याय पुढे आला. प्रथमता चीनने याचा वापर करुन दोन महिन्यात या संसर्ग महामारीचा बंदोबस्त केला आणि तो चालूच आहे. त्यामुळे चीन मध्ये जीवित हानी कमी झालेली दिसते. या संसर्गाला चीनने अतिशय जबाबदारीने नियंत्रणात आणले. त्याच बरोबर त्यांची प्रशासकिय यंत्रणा कार्यक्षमतेने या संसर्गाचा अटकाव केल्याचे दिसते. पण चीनने हे करीत असतांना संसर्गाचे परिणाम किती भयावह आहेत हे जगाला सांगितले नाही. त्या संबंधी खबरदारीचे आवाहन केलेले नाही. या बाबतीत चीनला अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रॅम्पने दोषी धरलेले आहे. हा संसर्ग चीन मधुन जगात पसरतो याला जबाबदार चीनच आहे. असाही आरोप केला की चीनने हे जाणीवपुर्वक असा हानीकारक विषाणू कृत्रिम निर्माण करुन जगात त्याचा प्रसार केलेला आहे. हा विषाणू जानेवारी-फेब्रुवारी २०१९ मध्ये सुरु होऊन सर्व युरोपात फैलावला.

युरोपात या संसर्गाचा प्रसार खुप वेगाने झाल्याचे दिसते याचे कारण म्हणजे जैविक शास्त्रज्ञांच्या मते थंड हवामानात हा विषाणू जास्त वेळ जिवंत राहतो आणि प्रसार करतो त्यामुळे तो युरोपात वाढ होवुन जीवित हानी झाल्याचे दिसते. दुसरा मुद्दा असा की युरोपीयन बहुधा सर्वच देश विकसीत राष्ट्रे आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान सर्वच क्षेत्रात उत्तुंग भरारी मारलेले आहेत. आरोग्याच्या बाबतीत खुप प्रगती असलेले राष्ट्रे आहेत. अर्थात युरोपीयन राष्ट्रांनी या प्रगतीच्या अंहमभावातुन पुढे आलेले दिसत नाहीत. अर्थात या विषाणुचा गांभिर्याने विचार केलेला नाही. आपणाला तो आटोक्यात आणता येईल असे त्यांना वाटले. यात त्यांचा बराच वेळ गेलेला दिसतो. नंतर मात्र या महामारीने अख्ख्या युरोपला विळखा घातल्याचे दिसते. युरोपातील इटली, स्पेन, फ्रान्स, इंग्लंड तसेच अमेरीका या राष्ट्रात या महामारीने कहर केलेला दिसतो. या विषाणूचा संसर्ग लाखोंच्या प्रमाणात वाढलेले दिसते. तसेच मृत्यूचे प्रमाणही दिवसेनदिवस महाभंयकर होत असलेले समोर आले आहे. अख्खा युरोप मृत्यूच्या तांडवात रुपांतरीत झाल्याचे दिसते. त्या बरोबरीने अमेरीकेतसुध्दा मृत्यूचे प्रमाण सातत्याने वाढत गेल्याचे दिसते. या राष्ट्राने या संसर्गाला गांभिर्याने घेतलेले दिसत नाही. जेंव्हा याचे रुग्ण गुणाकारात वाढत होते त्यावेळी या संसर्गाला गांभिर्याने घेतलेले दिसते. दुसरे म्हणजे या युरोपीन देशांनी लॉकडाऊन खुप उशिरा सुरु केले. ज्यावेळी हा संसर्ग गुणाकार करत होता तेंव्हा याचाच अर्थ वेळ निघुन गेलेली होती. दुसरा मुद्दा असा की, उदारमतवादी भांडवलशाही राष्ट्रात नागरी समाजात व्यक्तीचे दैनंदिन जीवन हे व्यक्तीवादी आहे अर्थात प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या विवेकाने स्वायत्त जीवन जगत असतो. त्यांच्यात समुदायवादी जीवन मुल्ये खुपच अत्यल्प आहेत. त्याच बरोबर वैयक्तीक जीवन जगत असतांना जबाबदारी, स्वंयशिस्त, स्वच्छता, इतरांना त्रास होणार नाही याचीही काळजी घेत असतो. हे व्यक्तीवादी जीवन ठिक आहे पण अशा महामारीला समुदायवादी भावनेची एकजुटता आवश्यक आहे. तिसरा मुद्दा असा की, उदारमतवादी भांडवलशाही राष्ट्रात शासकिय क्षेत्र कमी होऊन खाजगी क्षेत्र वाढलेले असते. युरोपातील बहुसंख्य राष्ट्रात हीच स्थिती दिसते. आणि खाजगी क्षेत्र नफा आणि तोटा या सुत्रावर आधारीत असते. शासकिय क्षेत्रात हे सुत्र कमी असते. आणि शासकिय जबाबदारी असते. अर्थात युरोपीयन देशामध्ये या खाजगी क्षेत्रामुळे जबाबदारी घ्यावयाला वेळ लागलेला दिसतो. उलट भारतामध्ये खाजगीकरण असले तरी शासकिय यंत्रणेचा विस्तार कल्याणकारी राज्यासाठी विस्तृत आहे. त्यामुळेच येथे समुदायवादी भावनेतुन केंद्रीय संरचनेत, कार्यपध्दतीत एकजुटता, सुसुत्रता, समन्वय दिसतो. युरोपीय राष्ट्रात याची संदिग्ध कमतरता दिसते.

भारताने चीन आणि युरोपीन देशांची अवस्था पाहुन खुप लवकर लॉकडाऊनची घोषणा केली आणि सर्व प्रशासकिय यंत्रणेला कामाला लावलेले दिसते. शिवाय हे कार्य खुप समुदायवादी भावनेतून एकजुटीने केल्याचे दिसते. त्याच बरोबर भारताला हवामानाने साथ दिल्याचे दिसते. भारताने ही खबरदारी का घेतली तर भारतात जगात नंबर दोनची लोकसंख्या आहे. तसेच आरोग्य यंत्रणा एवढी प्रगतशिल नाही. युरोपसारखे झाले तर आपले काय होईल या भिती पोटी त्याची काळजी घेतलेली दिसते. त्याला बऱ्याच प्रमाणात सध्यातरी यश दिसते.

### कल्याणकारी राज्याला उभारी (नवसंजीवनी) :

कोरोना नंतरच्या जगात कल्याणकारी राज्यांना नवसंजीवनी मिळतांना दिसत आहे. राज्याची भूमिका ही परत एकदा कल्याणकारी दिशेने वाटचाल होताना काही सत्य पुढे येत आहेत. खऱ्या अर्थाने राज्याच्या निर्मितीपासुन राज्यांच्या भूमिकेत बदल आपण पाहिलेले आहेत. मध्यकाळात राज्याची भूमिका फक्त व्यक्तींच्या जीविताचे, मालमत्तेचे आणि स्वातंत्र्याचे रक्षण करणे असेल. त्या बदल्यात व्यक्तीने राज्यांना आवश्यक तो कर द्यावा याचाच अर्थ राज्यांची भूमिका ही मर्यादित होती. उदा. जॉन लॉक, थॉमस पेन, अॅडम स्मिथ, हर्बर्ट स्पेन्सर इ. जॉन लॉकच्या मते 'राज्याची निर्मिती व्यक्तींच्या नैसर्गीक हक्काच्या रक्षणासाठी झालेली आहे. त्यामुळे राज्य हे नैसर्गीक हक्कांचे रक्षण करेल.' अन्यथा राज्यकर्ते बदलण्याचा अधिकार जनतेला आहे. थॉमस पेन आपल्या 'Rights Of Man' आणि 'Common

Senses' या ग्रंथात 'राज्याने फक्त व्यक्तींच्या इच्छा आणि आवडींना प्रोत्साहन द्यावे बाकी राज्याने नियंत्रणाचे कार्य करावे'. अँडम स्मिथ १७७६ च्या 'The welth of Nation' या ग्रंथात आर्थिक मानवाची संकल्पना मांडुन राज्याने व्यक्तींना सहज आर्थिक स्वातंत्र द्यावे. अर्थात अहस्तक्षेपी बाजार व्यवस्थेला प्रोत्साहन देवुन राज्यातील सर्व प्रश्न बाजार व्यवस्था सोडवेल. उरलेली नियंत्रणाची कार्य राज्यांनी करावे असे मत मांडलेले होते. अर्थात राज्यांचा व्यक्ती जीवनात कमीत-कमी हस्तक्षेप होता. मात्र अभिजात उदारमतवादी विचारधारेतुन अर्निबंध स्वातंत्र्यातुन संशोधन झाले. संशोधनातुन वैज्ञानिक प्रगती सुरु झाली. त्यातुन औद्योगीक क्रांतीने भांडवलशाही व्यवस्था वाढीस लावली. भांडवलशाहीने समाजातील आर्थिक विषमता टोकाची वाढविण्यास सुरवात केली. त्यातच जर्मनीमध्ये शोषितांच्या शोषणाला विरोध करण्यासाठी त्यांना योग्य तो उत्पादनाचा न्याय वाटा देण्यासाठी मार्क्सवादी विचारधारा पुढे आली. त्यामुळे या पार्श्वभूमिवर १९ व्या शतकात राज्यांच्या भूमिकेत जनहिताच्या कल्याणासाठी अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप करुन जनहितासाठी व्यक्तींच्या स्वातंत्र्यात हस्तक्षेप करण्याची भूमिका घेतली. अर्थात जनतेला शिक्षण, आरोग्य, पाणी, वीज, अन्न, रस्ते इतर सुरक्षितता देण्यासाठी कल्याणकारी भूमिका घेतली. उदा. हेरॉल्ड लॉस्की, थॉमस हिलग्रीन, जॉन स्टुअर्ट मील यासारख्या अभ्यासकांनी सेवाधर्मीय राज्यांना प्रोत्साहान दिले.

१९७०/८० च्या दशकात कल्याणकारी राज्यांचे दुष्परिणाम पुढे आल्याचे दिसतात. कल्याणकारी राज्यात आर्थिक नियोजन असल्याने राज्याच्या शक्तीत वाढ होऊन राज्यवर्चस्ववाद पुढे आला. त्यामुळे व्यक्तींची कृयशक्ती, जिज्ञासा वृत्ती कमी झाली उलट व्यक्तींच्या आयतखाऊ वृत्ती वाढीस लागल्या. त्यामुळे युरोपीयन राष्ट्रात; अमेरीकेत परत अभिजात उदारमतवादी विचार धारेची पुर्नरचना करुन बदलत्या परिस्थितीत राज्यांनी व्यक्तींची क्रयशक्ती वाढविण्याठी कल्याणकारी राज्यातून माघार घ्यावयाला सुरवात केली. उलट बाजुने पायाभूत सुविधेमधुन माघार घेऊन खाऊजा धोरणाला पाठींबा देण्यात येऊ लागला. अर्थात राज्यांने बाजार व्यवस्थेला प्रोत्साहाण दिले. त्यामुळे वैश्वीकरणात गुणवत्तेवर आधारीत स्पर्धात्मक बाजार व्यवस्था पुढे आली.

-या बाजार व्यवस्थावादी राज्यात आपणास आर्थिक प्रगती, वैज्ञानीक प्रगती झाल्याचे निष्पन्न होते. पण ही आधुनिकता कंटाळवानी आहे. एकाकी माणुस घडवणारी आहे. माणसाचे परात्मीकरण करणारी आधुनिकता आहे. माणसाला नैसर्गिक जीवनापासून दुर नेणारी, विनाकारण अर्थकारणासाठी जीवघेणारी स्पर्धा निर्माण करणारी आहे. तसेच बंदिस्त जीवन शैलीच्या कैदेत अडकलेली एकारलेली माणसे आपण पहात अहोत. त्याप्रमाणे वेगवेगळ्या मानसिक आजाराने पछाडलेली माणसे दिसतात. अर्थात एवढी प्रगती असतांना माणसे नैराश्यमय झालेली दिसत होती.

कोविड-१९ने सर्व जगभरात थैमान घालुन मोठ्या प्रमाणात जीवित्त हानी झाल्याचे दिसते. विशेषत: जे भांडवलशाही प्रधान प्रगतशिल राष्ट्रे आहेत तेथे बळीची संख्या खुप मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. त्याचे कारण काय आहे? जर्मनी, दक्षिण कोरीया, सिंगापूर मध्ये, तसेच भारतामध्ये कोरोना बळीची संख्या सध्या तरी कमी दिसते आहे. या स्पर्धात्मक नफा-तोटा आधारीत भांडवलशाही राष्ट्रांना परत एकदा कल्याणकारी राज्यांची गरज आणि महत्व अधोरेखित केलेले आहे. कोराना सारख्या संसर्ग रोग निवारणासाठी आता तात्पुर्ती यंत्रणा पुरेशी पडणार नाही. तर त्यासाठी जगातील सर्वच राष्ट्रांना कायमस्वरुपी सक्षम आरोग्य यंत्रणा उभारणे कसे गरजेचे आहे. हे आता जगभरातील वेगवगळ्या देशांच्या अनुभवावरुन स्पष्ट झालेले आहे.

अमेरीका, इटाली, स्पेन सारख्या देशांना त्यांची आरोग्य यंत्रणा सुसज्ज असली तरी ती व्यक्तीवादी जीवन शैलीत अडकलेली दिसते. म्हणून त्यांना सुध्दा आता आरोग्य यंत्रणेची विकेंद्रीत सक्षमता वाढवावी लागणार आहे. त्याच बरोबर आशा महामारीच्या प्रश्नावेळी समुदायवादी भावनेनेच उत्तर देवू शकतो, जिंकू शकतो.

भारतासारख्या विकसनशिल देशात परत एकदा बाजार व्यवस्थेच्या स्पर्धेत, घाईत पायाभूत सुविधेसंबधी आलेली मरगळ झटकुन आरोग्य व्यवस्था आणि कल्याणकारी राज्यांच्या पुनरुजीवनाचा प्रश्न गुंतागुतींचा आणि तातडीचा बनलेला आहे. या पार्श्वभुमीवर तात्पुरत्या स्वरुपात काही लाख कोटीचे पॅकेज नव्हे तर भारताच्या कानाकोपऱ्यात पोहचलेली स्वस्त रुणालये, सक्षम आरोग्य सेवेची उभारणी, आरोग्य सेवेचा कणा असलेली आरोग्य सेवेतील कर्मचारी, अद्यावत रुग्णालये, व्हेंटीलेटरर्स, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण अशी सक्षम विकेंद्रीत व्यवस्था निर्माण करणे म्हणजे कल्याणकारी राज्यांचे पुनरुजीवन होय. प्रसंगी कमकुवत आरोग्य सेवेवर आपली सर्व भीस्त टाकायची आणि एरवी मात्र वैद्यकिय सेवेचे झपाट्याने खाजगीकरण करावयाचे अशा प्रकारचा दुटप्पी व्यवहार विकसनशिल आणि अमेरीकेसारख्या प्रगतशिल राष्ट्रांना आता करता येणार नाही. हे सत्य कोरोनाने ढळढळीत समोर आणलेले आहे. त्याचबरोबर कोरोना संसर्गामुळे भारतातील अनेक शहरातील मजुरांचे स्थलांतर, त्यांच्या पोटा-पाण्याची सोय, राहण्याची व्यवस्था असे प्रश्न पुढे आलेले आहेत. त्यामुळे सर्वच राष्ट्रांना आपआपल्या देशातील पायाभूत यंत्रणाचा विस्तार, सक्षमता, कर्मचारी वर्ग, त्यांचे प्रशिक्षण याची मजबुत यंत्रणा निर्माण करावी लागेल त्यामुळे आता तरी कल्याणकारी राज्याचे महत्व अधोरेखित झालेले आहे.

**पर्यावरणा संबंधी :**

दुसऱ्या महायुध्दानंतरचे जगावरचे सर्वात मोठे संकट म्हणजे कोरोना विषाणुचा जगावरील हल्ला जो विषाणू अदृश्य आहे. त्यांनी जगातील सर्व मानवी समुदायांना भयभीत करुन सोडले आहे. यातुन तरी आपण काही शिकणार आहोत की नाही असा प्रश्न तुमच्या माझ्या समोर पडलेला आहे यातून मानवी समुहाला शिकण्यासारखे खुप आहे. पर्यावरण आणि मानवी जीवन यांचे अतुट असे नाते आहे. पर्यावरण म्हणजे साधारणतः आपले सभोवताल त्यात पाणी, हवा, जमीन आणि निसर्ग होय. या सभोवतालात आपले जीवन पुर्णत्वास जात असते. सभोवतालातील बदलाचा परिणाम मानवी शरीर आणि समुदायावर होत असतो. या अर्थाने संपुर्ण मानवी जीवन हे पर्यावरणाला पुरक असावे तरच आपला सर्वांगीन विकास, समृध्द, सुखी जीवन प्राप्त करता येते.

सध्याच्या भांडवली अर्थराजकीय चौकटीत मानवी समुदायाने

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded



पर्यावरणाचे अतोनात संतुलन बिघडवलेले आहे. हे आपण वारंवार घडणाऱ्या नैसर्गीक बदलातुन पहात असतो. मानवी समुदायाचे वाढत चाललेले भोगविलासी भौतिकवादी जीवन शैलीमुळे सभोवताल पर्यावरणात आपण प्रदुषण वाढवलेले आहे. या प्रवृत्तीमुळेच शहरी जीवन शैली वाढत आहे त्यामुळे वाढते शहरीकरण, अस्वच्छ पाणी, दुर्गंधीयुक्त प्लॅस्टीक, कचरा शहरातील सर्व नद्या ह्या गटारे झालेली आहेत. वारंवार शहरातील कचऱ्यांचा प्रश्न, हवा प्रदुषण, आवाज प्रदुषण हवेतील ओझोनचा थर कमी होत आहे. दिल्ली शहरातील वाहनांचे प्रदुषण. ऋतू चक्रातील बदल, पावसाच्या प्रमाणातील बदल हे गेल्या अनेक वर्षापासून आपण पाहात आहोत. येथे मला एकच सांगावयाचे आहे की, आपण पर्यावरणात सुधारणा करु शकत नाही. निसर्ग त्यासाठी समृध्द आहे. फक्त आपणाला स्वत: काही नैसर्गीक जबाबदारीने वर्तन करावयाचे आहे. ते म्हणजे पर्यावरण पुरक जीवन जगावयाचे आहे. आणि तेच अभिजात जीवन आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमिवर जगातील बहुसंख्य राष्ट्रांनी आपआपले आर्थिक आणि बाजार व्यवहार बंद करुन टाकले. त्यावर काही काळासाठी मर्यादा आणल्या आणि सर्वाचे जीवन जगणे अशक्य झाले. मला वाटते मानवी जीवन खऱ्या अर्थाने लॉकडाऊन झालेले नाही. कारण मानवाला जीवन जगायला जे पाहिजे ते मिळत आहे. जसे की सुर्योदय होत आहे, श्वास घेता येते, एकमेकांना संवाद करता येते, एकमेकावर प्रेम करता येते, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. स्वत:च्या कुटुंबात राहता येते, घरीच छंद जोपासता येते. एवढ्या गोष्टी करता येतात. त्यामुळे मुलभूत जीवन जगता येते त्यात काही अडचणी नाहीत.

भांडवलशाही राष्ट्रांनी प्रगतीच्या नावाने पर्यावणाचे संतुलन बिघडवुन टाकले अशा राष्ट्रांनी समुदायांनी परिषदा संमेलने घेवुन जसे की वसुंधरा परिषद असेल पर्यावरणाला नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न केला त्यासाठी हजारो कोटी रुपये ही खर्च करण्यात आला. उदा. भाजपा सरकराने गंगा नदी स्वच्छ करण्यासाठी हजारो कोटी रुपये खर्च केले. परंतू वरचेवर गंगा नदी प्रदुषीत झालेली दिसते. कोरोना संदर्भातील लॉकडाऊनच्या काळात सर्वच मानवी समुह स्वत:ला वाचविण्यासाठी घरात बसुन राहिल्याने, गाड्या न वापरल्याने, कारखाने बंद असल्याने, बाजार बंद असल्याने पर्यावरण स्वच्छ झाले, हवा स्वच्छ झाली, नद्या निळसर झाल्या, नदी किनारे स्वच्छ झाले. बहुसंख्येने नदी किनाऱ्यावर हजारो संख्येने कासव नदी किनारी येवुन अंडी घातल्याचे दिसते. सर्व पशू-पक्षी प्राणी इकडे तिकडे विहार करताना दिसतात. अर्थात या लॉकडाऊनमुळे कधी नाही एवढे पर्यावरण मानवी समुदायाला पोषक झाल्याचे दिसते. येथे हे लक्षात घेणे गरजेचे आहे की, पर्यावरणाला पुरक जीवन जगणे आवश्यक आहे.

**राष्ट्रधर्म हाच खरा धर्म :**

खरेतर दुसऱ्या महायुद्धानंतर विश्वव्यापी सर्वात मोठे संकट म्हणून कोरोना विषाणू संसर्गाचा फैलाव आणि त्यामुळे होणारी महाभयंकर मृत्यूचे तांडव याने जग हादरून गेलेले आहे. या कोरोना विषाणूने आतापर्यंत एक कोटी लोकांना संसर्ग झालेला असून लाखो लोक मृत्युमुखी पडलेले आहेत. या महामारी समोर प्रगतशील देशाबरोबरच जगातील सर्वच देश हतबल झालेले आहेत. या पार्श्वभूमीवर जगातील सर्व देशांनी या माहामारीला संपुष्टात कसे आणावयाचे यासाठी एकजुटीने एकमेकांना सहकार्य केले पाहिजे. वैश्विक स्तरावर सर्वच राष्ट्रांनी एकमेकांना सहकार्य करून या महामारीचा सामना केला पाहिजे. आपणास संविधानात्मक धर्मनिरपेक्षता काय आहे. दिल्ली येथील तबलीगी जमात या संघटनेचे उद्देश काय आहे. आणि सध्या काळातील तिचे वर्तन, तसेच तबलीगी जमातीने राष्ट्रनिष्ठे पेक्षा धर्म निष्ठेला प्राधान्य देऊन मुस्लिम समाजाला देशद्रोहाच्या कटघऱ्यात उभे केले का? अशा संकटकाळात तबलीगी जमातीविषयी भारतातील सर्व सामान्य जनतेमध्ये निर्माण झालेली भावना याचे विवेचन केलेले आहे.

भारताने स्वातंत्र्यानंतर उदारमतवादी लोकशाही शासनाचा स्वीकार करून भारतीय लोकांचे वर्तन निश्चित केलेले आहे. संविधानकारांनी कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना समान संधी आणि कायद्याचे राज्य स्वीकारलेले आहे. त्याच बरोबर घटनाकाराने धर्मनिरपेक्ष राज्यांचा स्विकार केलेला आहे. संविधानाच्या भाग-३ मध्ये सर्व लोक समुदायांना समान धर्मस्वातंत्र्य प्रदान केलेले आहे. पण या धर्मस्वातंत्र्याचा वापर स्वैराचारीपणाने करता येणार नाही. त्यावर देशाची एकात्मता, सभ्यता, संकट काळातील प्रश्न, नैतिकता या आधारे मर्यादा आणता येतात तो अधिकार राज्यांना असतो. शिवाय धर्म स्वातंत्र्याबरोबरच काही कर्तव्याचे पालनही करावे लागते. याबाबतीत तबलीगी जमातीने बेजबाबदारपणे अनैतिक वर्तन केलेले आहे.

'तबलीगी जमात' या संघटनेची स्थापना १९२६ मध्ये दिल्ली येथे निजामुद्दीन येथे झाली. (संस्थापक-मौलाना मोहम्मद इलियास) ही एक मुस्लिममधील परंपरावादी तत्वांचा आग्रह धरणारी मुस्लिम समाजातील लोकप्रिय संस्था आहे. भारताशिवाय जगातील दोनशे राष्ट्रांमध्ये तिच्या शाखा आहेत. दरवर्षी जगभर या संघटनेचे मुस्लिम कट्टरतावादी धर्माचा प्रचार करण्यासाठी इज्तेमा अर्थात मेळावे घेतात. ही संस्था इस्लामचा कट्टरतावाद पसरविते. त्याचबरोबर मदरशातुन धार्मिक शिकवण देणे, इस्लामचे श्रेष्ठत्व सिद्ध करणे, शिवाय ऐहिक जीवनापेक्षा परलौकिक जीवनाला महत्व देते. थोडक्यात प्रलोभने दाखवून समाजाला अधिकाधिक धर्मवादी बनविणे हा त्यांच्या कार्याचा गाभा आहे. त्यासाठी वारंवार होणाऱ्या इज्तेमा मधुन लाखोच्या प्रमाणात नवतरुण मुस्लीम प्रशिक्षण घेऊन गावोगावी धर्माची शिकवण देऊन कट्टरतावाद पसरवितात. हे त्यांचे कार्य जगभर चाललेले आहे. त्यांचे दिल्ली येथील मरकज ही मुख्य शाखा आहे या तबलीगी जमातने भारताअगोदर फेब्रुवारीमध्ये मलेशियात मोठी बैठक झाली. 'न्यूयार्क टाइम्सने' तिचे वर्णन दक्षिण आशियाई देशातील सर्वात मोठे विषाणू प्रसार केंद्र असे केले आहे. त्या बैठकीतील ६२० लोकांना कोरोना विषाणूचा संसर्ग झालेला होता. आणि ते जगभर पसरलेले होते. त्यानंतर मार्च मध्ये दिल्ली येथील निजामुद्दीन (मरकज) येथे बैठक झाली. यात जगातील अनेक देशातील मुस्लीम व्यक्तींनी भाग घेतला होता. त्यातील काहीजण कोरोना संसर्ग झालेले होते. अर्थात त्याचा प्रसार वाढीस लागला हे धोकादायक होते.

कोरोना विषाणू जात, धर्म, पंथ, लिंग, किंवा देश याची तमा न बाळगता पसरत असतो. कोरोनाचा युरोपातील फैलाव विशेषता इटली, स्पेन, फ्रान्स, अमेरिका या देशातील पाहून भारत सरकारने वेळीच पावले उचलली. त्यासाठी सुरुवातीला महाराष्ट्र सरकारने १७ मार्च २०२० रोजी सार्वजनिक व्यवहारावर बंदी आणली. त्यानंतर २२ मार्च रोजी 'जनता कर्फ्यू' ची घोषणा पंतप्रधानांनी केली. २४ मार्चला २०२० रोजी पंतप्रधानांनी कोरोनाला आळा घालण्यासाठी राष्ट्रीय लॉकडाऊन घोषित केले. त्यासाठी सरकारने सर्व राज्य सरकारांना आदेशित केले. धार्मिक उत्सव, मेळावे, सार्वजनिक उपक्रम, शाळा, महाविद्यालये, क्रीडा स्पर्धा अर्थात समूहाने कोणतीही कृती करता येणार नाहीत. त्यासाठी संचारबंदी घोषित केली. जनतेने त्यांनी सामाजिक अंतर ठेवण्याचे घोषित केले. तसेच 'घरी राहा सुरक्षित रहा' असे सूचित केले. अशा परिस्थितीत निजामुद्दीन येथे तीन चार हजार तबलीगी जमातीचे लोक लपून एकत्रित बसलेले होते. सरकारने पोलीस कार्यवाही करून. सर्वांना अलगीकरण करण्यात आले. त्यातील बहुसंख्य चौदाशेच्या आसपास तबलीगी कोरोना पॉझिटिव्ह निघाल्याने देशभर खळबळ माजली. शिवाय हे तबलीगी सर्व देशभर पसरले होते. अचानक दोन ते तीन दिवसात भारतभर कोरोना रुग्ण वाढत गेले आणि धोका वाढला. अशावेळेस खरेतर सर्वच मंदिरे, प्रार्थनास्थळे बंद होती. मात्र कर्नाटक, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, दिल्ली येथील मुस्लिम लोक मशिदीमध्ये समूहाने नमाज पडत होती. पोलिसानी त्यांना वारंवार सांगून ही ऐकावयाच्या मनस्थितीत नव्हते. काही ठिकाणी पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला. त्यातच तबलीगी जमातीचा मौलवी साद यांनी म्हटले 'अल्लाचा संदेश सर्वश्रेष्ठ असून जर तुम्हाला मशिदीत मृत्यू आला तर तो पवित्रच आहे'. असा विखारी प्रचार केल्याने भारतभर सामाजिक माध्यमातून वाद-विवाद झाले. काही मुस्लिम समुदायाने तबलीगी जमातीमुळे सर्व मुस्लिमांना बदनाम केले जाऊ नये असाही युक्तिवाद केला. बहुसंख्य मुस्लीम समाज भारत सरकारच्या बाजूने आहेत. हे जरी बरोबर असले तरी मुस्लिम समाजाचा मूलतत्त्ववादी चेहरा पुढे आलेला दिसतो. देश संकटात आहेत सर्व जग आणि जगातील सर्व धर्मीयांचे प्रार्थनास्थळे बंद असताना भारतात मात्र मुस्लीम समाज समुदायाने नमाज पडतो आहे हे सर्वसामान्य पर्यंत पोहोचले. हे देश विघातकी आहे. असा समज वाढत गेलेला दिसतो. एवढ्यावरही थांबलेले दिसत नाही. तबलीगींनी डॉक्टरवर थुंकणे, नर्स समोर नग्न अवस्थेत राहणे, पोलिसांवर हल्ले करणे, दगडफेक करणे असे प्रकार चालूच राहिले. सरकारला तबलीगी वर राष्ट्रीय सुरक्षा कायद्यान्वये कारवाई करावी लागली खरेतर तबलीगी समुदायाने शासनाच्या आदेशांचे पालन करून अलगीकरणात स्वतःहून पुढे यायला पाहिजे होते. तसे न होता त्यांना बऱ्याच मशिदीमधून पकडून आणावे लागले हे अतिशय देशद्रोही वर्तन म्हणावे लागेल.

मौलाना साद हा पुढे येऊन सर्व मुस्लिम बांधवांना सरकारच्या आदेशाचे पालन करा तसेच नैतिक जबाबदारी स्वीकारून आमच्यामुळे कोरोनाविषाणूचा फैलाव झाला असेल तर माफ करा असे वक्तव्य करण्याऐवजी अथवा स्पष्टीकरण देण्याची लपून बसला मुख्यतः अशा परिस्थितीत भारतातील मुस्लिम बांधवांनी एकत्र येऊन तबलीगीचा निषेध करून सर्वांनी सरकारच्या आदेशाचे पालन करावे. आम्ही देशा बरोबर आहोत असे विवेचन खूप वेळ करून काही मोजक्या मुस्लीम सुधारणावादी अभ्यासकांने केल्याचे दिसते.

तबलीगी समुदायांच्या वर्तनामुळे समाजात धार्मिक द्वेषाचे पडसाद उमटले पण दुसऱ्या बाजूने समाज माध्यमावर काही दृक-श्राव्य बनावटी व्हिडिओ बनवून टाकल्याने समाजात मुस्लिम समाजाला लक्ष्य करण्यात आले हेही नाकारता येत नाही. त्यामुळे मुस्लिम भाजी विक्रेत्यांकडून भाजी खरेदी करण्यात विरोध केला गेला. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे आणि गृहमंत्री अनिल देशमुखने असे बनावटी व्हिडिओ टाकणाऱ्यावर कारवाई करण्याचे आदेशित केले. त्यामुळे त्याला काही प्रमाणात आटकाव आला.

इस्लाम धर्मियांनी तातडीने सर्व प्रकारच्या धार्मिक संमेलनावर स्वतः होऊन बंदी घालायला हवी तशी ती घालणे त्यांच्याही हिताचे असेल आणि समाज आणि राष्ट्र हिताचे असेल अशा महामारीच्या प्रसंगी कोणत्याही धर्म समूहाचे स्वातंत्र्य राष्ट्र निष्ठेला पूरकच असायला हवे हे या कोरोनाच्या युद्धाच्या प्रसंगी स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे धर्मनिष्ठे पेक्षा राष्ट्रनिष्ठा श्रेष्ठ आहे हे तत्व आता सर्वमान्य झालेले आहे. जगातील बहुसंख्य राष्ट्रांनी स्वीकारलेले दिसते.

टिप : (लॉकडाऊन काळातील कोविड-१९च्या परिणामावरील स्वतः चिंतन-मंथनाचा गोषवारा)

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded